# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ / आषाढ ६, १९४६ (शके)**

**(१) उप मुख्यमंत्री**
**(२) मृद व जलसंधारण मंत्री**
**(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री**
**(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - ३५**

## छत्रपती शाहु महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्थेने पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठीची परीक्षा रद्द करण्याच्या मागणीबाबत

**(१) * २३८४७ श्री.कपिल पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध विभागांच्या अधिनस्त असलेल्या सारथी, महाज्योती व बार्टी या स्वायत्त संस्थामार्फत मराठा कुणबी, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व अनुसूचित जाती प्रवर्गातील आचार्य पदवी (पी.एच.डी.) विद्यार्थ्यांना अधिकतम पाच वर्षांसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते, मागील दोन वर्षांपासून या संस्थांमार्फत सर्व पात्र आचार्य पदवी (पी.एच.डी.) विद्यार्थ्यांना सरसकट संशोधन अधिछात्रवृत्ती (फेलोशिप) देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य त्वरित सुरू होऊन बहुतांश विद्यार्थ्यांचे संशोधन तीन वर्षात पूर्ण होते, तथापि, सारथी, महाज्योती आणि बार्टी संशोधन अधिछात्रवृत्तीचे अवार्ड लेटर आणि कृषी आचार्य पदवी नोंदणी यामध्ये जवळपास एक वर्षाचा कालावधी होतो, ज्यामध्ये कृषी संशोधक विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षीच्या अधिछात्रवृत्तीला मुकावे लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (सारथी) बार्टीच्या धर्तीवर पीएच.डी. अधिछात्रवृत्तीसाठी असलेली परीक्षा रद्द करावी, यासाठी उमेदवारांनी पुणे येथे उपोषण सुरु केले असल्याचे तसेच या उमेदवारांना सरसकट अधिछात्रवृत्ती द्यावी अशी मागणी केल्याचे माहे जानेवारी, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पीएचडी अधिछात्रवृत्तीसाठी सारथी, बार्टी, महाज्योती या संस्थांच्या सहा महिन्यात दोन वेळा परीक्षा घेऊन देखील अजूनही विद्यार्थी अधिछात्रवृत्ती पासून वंचित आहेत, तसेच पेट, सेट, नेट परीक्षा

पास होऊन ॲडमिशन मिळाले असून सारथी, बार्टी, महाज्योतीकडून मिळणारी अधिछात्रवृत्ती न मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन अर्धवट सोडले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सारथी, महाज्योती व बार्टी संशोधन अधिछात्रवृत्ती २०२३ करिता अर्ज सादर करणाऱ्या सर्व कृषी आचार्य पदवी विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून सरसकट अधिछात्रवृत्ती देण्यात यावी, जेणेकरून २३० कृषी आचार्य पदवीधारक (पीएचडी) विद्यार्थ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी सदर विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

बार्टी संस्थेकडून सन २०१८ ते २०२१ पर्यंत विद्यार्थ्यांना सरसकट अधिछात्रवृत्ती दिली आहे.

तथापि, सारथी व महाज्योती या संस्थांनी प्राप्त अर्जांमधील विद्यार्थ्यांची निवड सरसकट न करता मूळ कागदपत्रे पडताळणी व मुलाखतीद्वारे पात्र विद्यार्थ्यांची अधिछात्रवृत्तीसाठी निवड केली आहे.
(२) होय, अशा प्रकारच्या तक्रारी बार्टी व महाज्योती संस्थेकडे प्राप्त झाल्या आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४), (५) व (६) सारथी, बार्टी, महाज्योतीकडून मिळणारी फेलोशिप न मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन अर्धवट सोडले आहे असे आढळून आले नाही.

देशामध्ये विद्यापीठांमार्फत विविध विषयांवर आचार्य पदवी (पीएच.डी.) करण्याची सोय आहे. त्यामध्ये राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये एकंदरीत कृषी आचार्य पदवी (पीएच.डी.) संच संख्या प्रतिवर्षी २३० इतकी आहे. राज्य शासनाने शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये बार्टी, सारथी, महाज्योती व अमृत तसेच इतर तस्तम स्वायत्त संस्था अंतर्गत लाभार्थ्यांकरीता असलेल्या योजनांकरीता सर्वंकष धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार सर्व विषय शाखा मिळून सारथी, बार्टी व महाज्योती या संस्थांना अधिछात्रवृत्तीकरीता प्रत्येकी २०० विद्यार्थी संख्येचे उद्दीष्ट व निकष (यु.जी.सी.च्या मार्गदर्शक सूचना, वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ८.०० लाख, इ.) निश्चित करुन दिलेले आहे. मंजूर संच संख्येपेक्षा जादा अर्ज प्राप्त झाल्याने गुणवत्तेच्या आधारावर विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठामार्फत परीक्षा आयोजित करण्यात आली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत या संस्थांसाठी अधिछात्रवृत्तीसाठीची चाळणी परीक्षा दिनांक १० जानेवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आली. सदर चाळणी परिक्षेबाबत तक्रारी प्राप्त झाल्याने मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी ३ सदस्यांची समिती गठीत केली असून सदर समितीमार्फत याबाबतची चौकशी सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अंमली पदार्थाची तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत.

**(२) * २३६३८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सचिन अहिर, श्री.प्रसाद लाड, श्री.एकनाथराव खडसे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननी **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी विशेषत: बुलढाणा जिल्ह्यातील अनेक भागात अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात साठवणूक, वाहतूक व विक्री होत असून बेकायदेशीरपणे ऑनलाईन जुगार, मटका चालविण्याचे प्रकारही मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे तसेच भुसावळ (जि.जळगाव) येथील दोन तरुणांकडून लाखो रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इरळी (ता.कवठेमहाकांळ, जि.सांगली) येथील शेतात निर्जनस्थळी एमडी ड्रग्जनिर्मिती करणाऱ्या कारखान्यावर मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने छापा टाकून तब्बल २४५ कोटी रुपयांच्या ड्रग्ज निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल जप्त केला असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत कोट्यवधी रुपयांच्या अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळया सक्रीय असून १०० कोटी रुपयांचे कोकेनसह २ विदेशी तस्करांना विमानतळावर अटक केली असून, नवी मुंबईतील उलवे येथे चार शालेय विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांचे एलसीडी ड्रग्ज जप्त करण्यात येऊन विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले आहे तसेच कांदिवली पश्चिम (मुंबई) येथे चाळीतील एका छोट्या खोलीमध्ये मेफेड्रॉन (एमडी) बनविण्याच्या कारखान्यावर पोलिसांनी दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी वा त्यादरम्यान छापा टाकून दोन आरोपींना अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री होत असल्यामुळे नागरिक व विद्यार्थी व्यसनाच्या आहारी जात असून अंमली पदार्थाच्या तस्करीमध्ये शालेय विद्यार्थ्यांचाही सहभाग वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बृहन्मुंबई परिसरामध्ये शाळा, महाविद्यालयांपासून पाचशे मीटर अंतरावरील छोट्या टपऱ्या किंवा तत्सम आस्थापनांवर गृह विभाग आणि महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आलेल्या कारवाईत आतापर्यंत किती आस्थापनांवर कारवाई करण्यात आली व मुंबईसह राज्यातील विद्यार्थी व तरुणांमध्ये दिवसेंदिवस ड्रग्जच्या सेवनाचे प्रमाण वाढत असल्याने यावर कोणते प्रतिबंधात्मक उपाय शासनातर्फे करण्यात आले वा येत आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील अंमली पदार्थांची साठवणूक, वाहतूक व विक्री रोखण्यासाठी व तस्करांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) बुलढाणा जिल्ह्यात अंमली पदार्थांची वाहतूक/विक्री तसेच चोरुन लपून ऑनलाईन जुगार, मटका चालवणाऱ्यां विरोधात तात्काळ छापा टाकून कारवाई करण्यात येते. त्यानुसार २०२४ मध्ये बुलढाणा जिल्ह्यात एनडीपीएस कायद्यानुसार ०५ गुन्हे व महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत एकूण ७४७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथे ४ व्यक्तिंनी अंमली पदार्थ जवळ बाळगल्याचे आढळून आल्याने भुसावळ बाजार पोलीस स्टेशन येथे CCTNS No ७२/२०२४ एनडीपीएस कायदा कलम २१(क), २२(क) व ८(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दिनांक १५/०५/२०२४ रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नवी मुंबईतील उलवे येथे चार शालेय/कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून एलएसडी पेपर ड्रग्ज जप्त करण्यात आले असून त्यासंदर्भात एनआराआय पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९५/२०२४ एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क) २२(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कांदिवली पश्चिम (मुंबई) येथे चाळीतील एका छोट्या खोलीमध्ये मेफेड्रॉन (एमडी) बनविण्याच्या कारखान्यावर केलेल्या छापा कारवाईच्या अनुषंगाने मालवणी पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र. २५/२०२४ एनडीपीएस ॲक्ट कलम ८(क), २२, २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

विदेशी तस्करांना विमानतळावर अटक करण्याची बाब केंद्रीय यंत्रणांशी संबधीत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे/शाखा यांनी शाळा कॉलेजेस पासून पाचशे मीटर अंतरावरील छोट्या टपऱ्या किंवा तत्सम आस्थापनांवर गृह विभाग आणि महानगरपालीकेच्या संयुक्त विद्यमानाने केलेल्या कारवाईत सन २०२३ ते माहे एप्रिल २०२४ पर्यंत एकूण ५०९ गुन्हे नोंद केले आहेत.

अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासना मार्फत खालीलप्रमाणे उपययोजना करण्यात येतात.

- मुंबई शहरामध्ये तसेच राज्यामध्ये अंमली पदार्थ तस्करांविरुध्द विशेष मोहीमा, शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम तसेच वाहन रॅली व पथनाट्ये आयोजनाद्वारे अंमली पदार्थ सेवन व विक्री न करण्याबाबत जनजागृती करण्यात येते.
- राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.
- विशेष पोलीस महानिरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अंमली पदार्थांबाबतचे “समन्वय अधिकारी” म्हणून शासन निर्णय दिनांक ०६/०१/२००७ अन्वये घोषित करण्यात आले आहे.
- अंमली पदार्थावर आळा घालण्यासाठी राज्यस्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समिती व जिल्हा स्तरावर जिल्हास्तरीय नार्कोकोऑर्डीनेशन समितीची स्थापना करण्यात आली असून सदर समित्यांकडून अंमली पदार्थावर आळा घालण्याबाबत वेळोवेळी आढावा घेतला जातो.
- जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिना निमित्त दरवर्षी २६ जून पासून १५ दिवस अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविले जाते. सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्याद्वारे जनजागृती केली जाते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढीव वीज दराबाबत फेरनिर्णय घेण्याबाबत

**(३) * २३४०९ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सत्यजीत तांबे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीमार्फत वितरित करण्यात येणाऱ्या वीजेच्या दरामध्ये सुमारे २५ ते ३५ टक्के वाढ केली असून, घरगुती, सर्वसामान्य ग्राहक, शेतीपंप, औद्योगिक, व्यावसायिक ग्राहकांच्या वीज दरात ६% ते ८ % ची वाढ वीज नियामक आयोगाद्वारे केल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर राज्यात महाराष्ट्राच्या तुलनेत वीजदर कमी असून व काही राज्यात ठराविक युनिट वीज मोफत देण्यात येते, परंतु महाराष्ट्रात मोठी दरवाढ लागू झाल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून राज्यातील सर्वसामान्य ग्राहक, शेतीपंप, औद्योगिक, व्यावसायिक ग्राहकांचा महावितरण कंपनीने केलेल्या दरवाढीला विरोध होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज कंपन्यांची अकार्यक्षमता व वीज गळतीमुळे त्यांना तोटा होत असल्याने, सदर दरवाढीचा भार ग्राहकांवर लादण्याऐवजी कंपन्यांची कार्यक्षमता वाढवावी व वीज गळती कमी करण्यासाठी उपाययोजना करावी`अशी मागणी विविध संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात वाढीव वीज दराबाबत फेरनिर्णय घेऊन वीजेची दरवाढ मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत : खरे आहे.

वीजदर नियामक आयोगाद्वारे आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या तुलनेत सरासरी ५.६% इतकी वीजदर वाढ मंजूर करण्यात आली आहे.

(२) हे अंशत : खरे आहे.

महाराष्ट्रात मोठी दरवाढ लागू झाल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले नाही. तथापि, वीजदरवाढीच्या अनुषंगाने शासनास काही निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. मा.वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर याचिका आदेशानुसार (MYT Tariff Order) राज्यात वीजदर निश्चित केले जातात. सदर वीजदर निश्चितीचे अधिकार मा.वीज नियामक आयोगास (MERC) आहेत.

मा.आयोगाच्या आदेशानुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ करीताचे वीजदर दिनांक ०१/०४/२०२४ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या हरित हायड्रोजन धोरणाबाबत

**(४) * २३३५८ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हायड्रोजन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या कंपन्या तसेच स्टील उद्योगातील कंपन्यांसोबत ३ लाख १६ हजार ३०० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार तसेच सात हायड्रोजन प्रकल्पांमध्ये जवळपास २,७६,३००/- कोटी रूपयांची आर्थिक गुंतवणुक करणाऱ्या विविध कंपन्यांसोबत शासनाने करार केल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात निर्माण होणाऱ्या हायड्रोजन वापराच्या अनुषंगाने हायड्रोजनचा वापर करून चालविण्यात येणाऱ्या वाहनांची निर्मिती तसेच हायड्रोजनवर आधारित उपकरण निर्मितीस प्रोत्साहन देणे व रोजगार उपलब्ध करून देणे इ. बाबत शासनाने धोरण निश्चित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या हरित हायड्रोजन उत्पादनात वाढ करण्याच्या अनुषंगाने शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या धोरणाच्या माध्यमातून राज्यात हरित हायड्रोजन प्रकल्प सुरू करणाऱ्या कंपन्यांना सोई-सवलती व लाभ दिले जाणार असून या धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता राज्य शासनाने पुरेशा निधीची तरतूद केली आहे काय किंवा करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात हायड्रोजनच्या वापर करणाऱ्या उद्योगधंद्यांमध्ये हायड्रोजन सुरक्षितपणे हाताळणाऱ्या प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळाची गरज विचारात घेऊन कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून या क्षेत्रातील प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याकरीता काही उपक्रम, प्रशिक्षण अथवा अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शासनाच्या वतीने हरित हायड्रोजन विकासकांसोबत सामंजस्य करार करण्यात आले असून याद्वारे अंदाजे गुंतवणूक रुपये २,९१,३००/- कोटी इतकी अपेक्षित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ हे ऊर्जा विभागामार्फत दिनांक १७/१०/२०२३ रोजी प्रसिध्द केले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणी कालावधीमध्ये राज्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) /स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिवहन उपक्रमातील हरित हायड्रोजन आधारीत फ्युएल सेल (Fuel-cell) प्रवासी वाहनांना राज्य परिवहन विभागामार्फत ३० टक्के भांडवली खर्च अनुदान (CAPEX Subsidy) देण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) होय.

महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण-२०२३ अन्वये स्वतंत्र हरित हायड्रोजन कक्षासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ घेणे, एक खिडकी सुविधा इत्यादी उपक्रम राबविण्याकरीता वर्ष २०२४-२५ साठी सुमारे रुपये ४.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. धोरणाच्या अनुषंगाने पुढील आर्थिक वर्षात आवश्यक ती तरतूद करण्यात येणार आहे.

(४) महाऊर्जाच्या माध्यमातून हरित हायड्रोजन क्षेत्रामध्ये प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याकरीता दिनांक १६,२१,२७ फेब्रुवारी व ०६ मार्च, २०२४ अशा चार सत्रात व्हिडिओ कॉन्फरन्सिंग

(VC) व्दारे हरित हायड्रोजन एक्झिक्युटिव्ह मास्टरक्लास आयोजित केला होता. या कार्यक्रमात ऊर्जा विभाग, जलसंपदा विभाग, कौशल्य व रोजगार विभाग, परिवहन विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महारेल, मुख्य विद्युत निरीक्षक, तसेच महावितरण, महापारेषण, महानिर्मिती इ. विभागांचे प्रतिसत्र ३२ अधिकारी सहभागी झाले होते.

तसेच हरित हायड्रोजन व त्याचे तत्सम उत्पादने (Derivatives) प्रकल्पांसाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी आयटीआय, पॉलिटेक्निक आणि अभियांत्रिकी शैक्षणिक संस्था व अन्य तांत्रिक संस्थांच्या सहकार्याने कार्यशाळा व इतर उपक्रम राबविणे इत्यादी उपक्रम टप्प्याटप्याने हाती घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत पारनेर (जि.अहमदनगर) व ता.करमाळा (जि.सोलापूर) येथील डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याच्या प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(५) * २३५०४ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत पारनेर (जि.अहमदनगर) व करमाळा (जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेल्या कुकडी प्रकल्पातील डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याचा प्रकल्प मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डिंभे-माणिकडोह प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करून शेतकऱ्यांच्या शेतीसाठी कधीपर्यंत पाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे व त्याअनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही.

कुकडी प्रकल्पातील डिंभे डावा कालव्याच्या वहन क्षमतेच्या अडचणीमुळे सदर कालव्यास पर्याय म्हणुन डिंभे-माणिकडोह बोगदा करण्याची मागणी व प्रस्ताव आहे.

सदर डिंभे-माणिकडोह बोगद्यास शासनाने कुकडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमा मध्ये समावेश करण्यास शासन पत्र दिनांक २८ जुन २०२२ रोजीच्या पत्रान्वये तत्वत: मान्यता प्रदान केली आहे.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी दिनांक २३/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये डिंभे-माणिकडोह बोगद्याचा कुकडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमात अंतर्भाव करून सदर प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती-२, पुणे यांच्याकडे पाठविला आहे.

शासन निर्देशानुसार कुकडी प्रकल्पाचे फेरजलनियोजन प्रस्तावित असून त्याचा अभ्यास WAPCOS, नवी दिल्ली या केंद्रीय संस्थेमार्फत सुरु आहे. सदर फेरजलनियोजन अंतिम झाल्यावर व बोगद्याचे काम अंतर्भूत असलेल्या कुकडी प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेनंतर बोगद्याचे काम करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडा वसाहतींच्या भाडेपट्टा नुतनीकरणाच्या धोरणाबाबत

**(६) * २३१२४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वसाहतींचा भाडेपट्टा शीघ्रगणकाशी (रेडी रेकनर) जोडला असल्यामुळे भाडेपट्ट्यात वाढ झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडेपट्टीबाबत सवलत दिली जाणार असल्याचा म्हाडाचा दावा खोटा ठरला असून फक्त दंडात्मक तरतूद ७५% वरून ५०% पर्यंत आणण्यात आल्यामुळे म्हाडा वसाहतींना भाडेपट्टा नुतनीकरणासाठी कोट्यवधी रुपये भरावे लागणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील बहुतांश म्हाडा वसाहतीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय नागरिकांना सदरचा वाढलेला भाडेपट्टा भरणे शक्य नसल्यामुळे अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील म्हाडा वसाहतीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय नागरिकांना अधिकच्या भाडेपट्ट्यातून दिलासा देण्याकरीता सध्याचे धोरण रद्द करून पूर्वीचे धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) अंशत खरे आहे.

(२) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरण ठराव क्र. ६९९५ दिनांक २६/०८/२०२१ मध्ये पूर्व परवानगी न घेता परस्पर भुखंडांचा भाडेपट्टा करारनामा हस्तांतरण केल्यास ७५% दंडाची तरतुद होती. ती प्राधिकरण ठराव क्र. ७०९४ दिनांक २९/०२/२०२४ अन्वये ५०% वर आणण्यात आली आहे.

तसेच ठराव क्र. ६९९५ मध्ये निवासी वापराकरीता असणाऱ्या भूखंडाकरीता रेडी रेकनर दराच्या २५ % रक्कमेच्या २.५ % भुईभाडे म्हणून आकारण्यात येत होते. त्यामध्ये सुधारणा करून ठराव क्र. ७०९४ मध्ये निवासी वापराकरीता असणाऱ्या भूखंडाकरीता ५०० चौ.मी पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी रेडी रेकनर दराच्या २५ % रक्कमेच्या १% रक्कम भुईभाडे म्हणून आकारण्याबाबत सुधारणा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार भुईभाडे करारनामा नुतनीकरण करताना ५०० चौ. मी. पर्यंतच्या भुखंडाच्या भुईभाड्यामध्ये म्हाडाने सवलत दिलेली आहे.

(३) याबाबत गृहनिर्माण संस्थांकडून म्हाडाकडे अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोन, पनवेल येथील गिरणी कामगारांच्या घराचे सेवाशुल्क माफ करण्याबाबत

**(७) * २२९५७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोन, पनवेल येथील गिरणी कामगारांच्या घरासाठी आकारण्यात येत असलेले वार्षिक ४२ हजार रुपये सेवाशुल्क माफ करावे, अशी मागणी गिरणी कामगारांच्या संघटनांनी म्हाडाकडे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने कोन, पनवेल येथील गिरणी कामगारांच्या घरासाठी आकारण्यात येत असलेले वार्षिक ४२ हजार रुपये सेवाशुल्क माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कोन, पनवेल येथील गिरणी कामगारांच्या सदनिकांकरीता ठरविण्यात आलेले देखभाल शुल्क माफ करण्यात यावेत याबाबत विविध संघटनाकडून म्हाडाकडे मागणी होत आहे.

सदर इमारतींच्या देखभालीवर होणारा खर्च हा म्हाडाकडून भागविता येणे शक्य नसल्यामुळे त्याबाबत म्हाडास्तरावर बैठक घेऊन संघटनांना म्हाडामार्फत अवगत करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येच्या तपासाबाबत

**(८) * २२९१७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर (मुंबई) येथील माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येसंदर्भात सी.सी.टी.व्ही. फुटेज पोलिसांकडे उपलब्ध असतानाही दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी होऊनही आरोपींना अटक करण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घोसाळकर यांच्या हत्येचा तपास संथ गतीने सुरु असून आरोपींना संरक्षण देण्याचे काम शासन करीत असल्याने, सदर तपास सीबीआय किंवा विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) वर्ग करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर हत्येसंदर्भात पोलिसांकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या तपासाचा आणि जमा केलेल्या पुराव्यांचा तपशिल, संशयितांच्या मोबाईल नोंदी याबाबतची माहिती शासनास प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येसंदर्भात पोलिसांनी किती आरोपींना अटक केली, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार माहिती सादर करण्यात आली आहे काय, तसेच घोसाळकर यांच्या कुटुंबियांच्या मागणीनुसार हत्येचा तपास अन्य यंत्रणेकडे सोपविण्याबाबत व त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. अभिषेक घोसाळकर हत्येप्रकरणी घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेले अग्नीशस्त्र मयत आरोपीचा अंगरक्षक अमरेंद्रकुमार मिश्रा याचे असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास, सदर गुन्हा घडल्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक ०९/०२/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

(२) सदर गुन्ह्याचा तपास सीबीआय किंवा विशेष तपास (एसआयटी) पथकाकडे वर्ग करण्याच्या मागणीसाठी घोसाळकर यांच्या पत्नीने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.७२२७/२०२४ अन्वये याचिका दाखल केली आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी आरोपीताच्या मोबाईलचे सिडीआर तसेच सी. सी. टी. व्ही. फुटेज तपासण्यात आले आहेत. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिकेमध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या दिनांक ०६/०५/२०२४ च्या आदेशानुसार, घोसाळकर कुटुंबिय व त्यांचे वकील यांना सदर घटनेचे सीसीटीव्ही फुटेज दाखविण्यात आले आहेत. प्रस्तुत गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून दोषारोप पत्र मा.न्यायालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांतील रिक्त पदे भरण्याबाबत.

**(९) * २३८५३ श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेत कर्मचारी-अधिकारी यांची ५० टक्क्यांहून अधिक पदे रिक्त असून बालकांवरील लैंगिक अत्याचाराची (पोक्सो) १८२५ प्रकरणे व महिलांवरील गुन्हयासंबंधीची डी.एन.ए.(३७६ IPC) १२६२ इतकी प्रकरणे प्रलंबित असून, सदर रिक्त पदांमुळे प्रयोगशाळेत येणाऱ्या नमुन्याच्या तपासणीत दीर्घ विलंब होत असल्याने याचा कनिष्ठ न्यायालयांतील प्रकरणांवर मोठा परिणाम होत असल्यामुळे पिडितांना वर्षानुवर्षे न्याय मिळत नसल्याचे माहे जानेवारी,२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील अधिकारी-कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय अंतर्गत गट- अ ते गट-ड संवर्गात एकूण मंजूर १४६३ पदांपैकी १०२३ पदे कार्यरत असून ४४० पदे रिक्त आहेत.
(२) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील उपसंचालक, गट-अ संवर्गातील सरळसेवा कोटयातील २ पदे, सहायक संचालक (संगणक गुन्हे ध्वनी व ध्वनिफित विश्लेषण), गट-अ संवर्गातील सरळसेवा कोटयातील ३ पदे, वैज्ञानिक अधिकारी (संगणक गुन्हे ध्वनी व ध्वनिफित विश्लेषण), गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सरळसेवा कोटयातील १३ पदे, सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सरळसेवा कोटयातील ३१ पदे, लिपिक टंकलेखक गट-क (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील) ९ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात आलेली आहेत. लिपिक-टंकलेखक (गट-क) संवर्गातील ३६ पदांचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तसेच, गट-क संवर्गातील १२५ पदांची भरती प्रक्रियेचे कार्यादेश मे. TCS या कंपनीस कार्यादेश देण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर पदांची जाहिरात दिनांक ०५/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असून भरती प्रक्रिया सुरु आहे.

गट-क संवर्गातील २ व गट-ड संवर्गातील २२६ अशी एकूण २२८ पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात आलेली आहेत.

प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्याकरीता ५२५ पदे २ वर्षाकरीता कंत्राटी तत्वावर भरण्यास मान्यता दिली आहे. त्यापैकी सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब १६६ पदे व वैज्ञानिक सहायक, गट-क १६६ पदे अशी एकूण ३२२ पदे FACT द्वारे भरण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यापैकी ४५ पदे भरण्यात येत आहेत व उर्वरित पदे भरण्याची प्रकीया सुरु आहे. उर्वरित प्रयोगशाळा परिचर, (गट-ड) १६६ पदे व लिपिक टंकलेखक, गट-क २५ पदे बाह्ययंत्रणेद्वारे पदभरती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनिफित विश्लेषण विभागातील प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकालात काढण्याकरीता (सेमी ॲटोमेटेड प्रोससिंग) प्रकल्पास शासन मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच दिनांक १६/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुणे येथे सेंटर ऑफ एक्सलन्स सुरू करण्यास मान्यता दिली असून प्रकल्प अंमलबजावणी प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रकल्प अंमलात आल्यानंतर प्रकरणे जलदगतीने निकाली काढता येतील.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय संगणकीकरण प्रकल्प सुरु करण्यात आला असून अमंलात आल्यानंतर कागद विरहीत कामकाजामुळे जास्तीत जास्त प्रकरणे विश्लेषित होण्यास मदत होणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी मुलींना दूषित अन्न व पाण्यामुळे रुग्णालयात दाखल करावे लागल्याबाबत

**(१०) * २२९०० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी मुलींना दूषित अन्न व पाण्यामुळे उलटी, डेंग्यू, मलेरिया, काविळ अशा आजारांचा प्रार्दुभाव होऊन त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागल्याची गंभीर बाब दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उक्त पोलीस प्रशिक्षण केद्रांतील प्रशिक्षणार्थी मुलींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल न केल्याने त्या मुलीला स्वत:च उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल व्हावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने निष्काळजीपणा करणाऱ्या स्थानिक प्रशासनातील संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस प्रशिक्षणार्थींना दूषित अन्न व पाण्यामुळे आजार होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथील काही प्रशिक्षणार्थी यांना दिनांक २७ मार्च २०२४ पासून काविळ व इतर आजाराची लक्षणे दिसू लागल्याने वैद्यकीय सहाय्यता मिळण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अकोला, जिल्हा शल्य चिकीत्सक अकोला, आयुक्त महानगरपालिका, अकोला, अधिष्ठाता जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला व जिल्हा साथरोग अधिकारी अकोला यांना पत्रव्यवहार करण्यात आला व त्यांचेमार्फत उपलब्ध झालेल्या विविध वैद्यकीय पथकाकडून तातडीने तपासणी करुन प्रशिक्षणार्थींवर औषधोपचार सुरु करण्यात आला.

एकूण १५७ प्रशिक्षणार्थी यांना काविळची लागण झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यापैकी ३८ प्रशिक्षणार्थी यांना प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला येथे आंतररुग्ण म्हणून उपचार देण्यात आले तथापि, प्रकृतित सुधारणा न झाल्याने व त्यांचे विनंतीवरुन त्यांना खाजगी रुग्णालयात संदर्भित करण्यात आले. २८ प्रशिक्षणार्थी यांना जास्त प्रमाणात लक्षणे दिसुन आल्याने त्यांना थेट खाजगी रुग्णालयात संदर्भीत करण्यात आले. ६ प्रशिक्षणार्थी यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात औषधोपचार घेऊन डिस्चार्ज देण्यात आला. तसेच ८५ प्रशिक्षणार्थी यांना सौम्य लक्षणे असल्याने त्यांना पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्येच विलगीकरण कक्षात उपचार देण्यात आले.

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांनी दिनांक ३०/०३/२०२४ व दिनांक ३१/०३/२०२४ रोजी अकोला पोलीस प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन जिल्हाधिकारी अकोला,जिल्हा शल्य चिकीत्सक अकोला, आयुक्त, महानगरपालिका अकोला व जिल्हा साथरोग अधिकारी, अकोला यांचेशी चर्चा केली व पुढील उपाययोजनेसंदर्भात निदेश दिले.

(४) पोलीस प्रशिक्षण केंद्रातील मेस मध्ये व आंतरवर्ग क्लासरुम जवळ आधुनिक पध्दतीचे आरओ + युव्ही बसविण्यात आले आहेत. सर्व पाण्यांच्या टाक्यांची नियमीतपणे साफसफाई करुन घेण्यात येते, सर्व बोरवेल्स व पाण्याच्या टाक्यांचे नियमीतपणे क्लोरीनेशन करुन घेण्यात येते. तसेच पिण्याच्या पाण्याचे नमूने प्रत्येक महिन्यास तपासणीसाठी पाठविण्यात येतात व पाणी पिण्यास योग्य असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पिण्यासाठी पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. प्रशिक्षणार्थी यांना अन्न पुरवठा करणारी मेस FSSAI यांचेकडून प्रमाणित करण्यात आली असून प्रशिक्षणार्थी यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराची मेस कमिटीकडून तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराबाबत

**(११) * २३६१५ ॲड.अनिल परब, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निर्धन आणि दुर्बल घटकातील रुग्णांसाठी २०% खाटा राखीव ठेवण्याच्या सूचना दिल्यानंतरही उपचार देण्यास नाकारणाऱ्या तसेच गरिबांसाठी राखीव असलेल्या खाटा अन्य रुग्णांसाठी वापरून रुग्णालय पैसे आकारत असल्याने धर्मादाय रुग्णालयांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची पुनर्रचना करण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय रुग्णालयातील १० टक्के खाटा निर्धन रुग्णांसाठी मोफत तर १० टक्के दुर्बल घटकातील रुग्णांसाठी ५०% सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्या जातात, परंतु सदर खाटा रिक्त असूनही मुंबईसह राज्यातील बहुसंख्य रुग्णालये सर्वसामान्य रुग्णांना दाखल करून घेत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात उक्त निर्णयानुसार कोणकोणत्या जिल्ह्यांमध्ये समितीची स्थापना करण्यात आली आहे आणि समितीची कार्यकक्षा काय आहे तसेच धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने या रुग्णालयातील प्रत्येक उपचाराचे दर ठरवून शासनाला त्यांचा अहवाल सादर केला आहे काय, केला असल्यास त्यात काय शिफारशी करण्यात आल्या आहेत,
(४) असल्यास, निर्धन आणि दुर्बल घटकातील रुग्णांसाठी २० % खाटा राखीव ठेवणे, धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराला आळा घालणे, प्रत्येक उपचाराचे दर ठरवणे व दर पत्रकाचे फलक रुग्णालयाच्या आवारात लावण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी असलेल्या रुग्णालय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०९/०५/२०२४ शासन शुध्दीपत्रकान्वये जिल्हास्तरीय समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. तसेच सदर समितीवर दिनांक १४/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी खाटा रिक्त असूनही रुग्णांना दाखल करुन घेत नाहीत अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(३) निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी असलेल्या रुग्णालय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ३१/१०/२०२३ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक ०९/०५/२०२४ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये जिल्हास्तरीय समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. तसेच सदर समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक दिनांक १४/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार जिल्हास्तरीय समितीने जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयातील रुग्णखाटा आरक्षित करून त्याची माहिती ऑनलाईन पोर्टलद्वारे राज्यस्तरीय विशेष मदत कक्षास उपलब्ध करुन देणे व सदर योजनेची अंमलबजावणी योग्यपणे व प्रभावीपणे करण्यासाठी राज्यस्तरीय विशेष मदत कक्षास सहाय्य करणे आवश्यक आहे. तसेच रुग्णालयातील प्रत्येक उपचाराचे दर ठरविणे ही बाब जिल्हास्तरीय समितीच्या कार्यकक्षेमध्ये येत नाही. दिनांक ०९/०५/२०२४ च्या शासन शुध्दीपत्रकानुसार सदर समितीने तीन महिन्यात किमान एक वेळा बैठक घेऊन त्याचा अहवाल धर्मादाय आयुक्त यांना सादर करणे व शासनास त्याची प्रत सादर करणे आवश्यक आहे. अद्याप सदर समितीचा अहवाल अप्राप्त आहे.
(४) निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी २०% खाटा राखीव ठेवणे, धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराला आळा घालणे यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० व मा.उच्च

न्यायालय आदेशित योजनेनुसार कार्यवाही केली जाते. तसेच रुग्णालयातील उपचाराचे दर ठरविणे ही बाब जिल्हास्तरीय समितीच्या कार्यकक्षेत येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्त कार्यालयाकरीता वाहन चालकांची वाढीव पदे निर्माण करण्याबाबत

**(१२) * २३०३४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शहर, छावणी, सिडको, वाळुज महानगर व ग्रामीण क्षेत्र मिळून १६८५ चौ.कि.मी क्षेत्रफळ असून जवळपास २२ लक्ष लोकसंख्या असून शहर व जिल्ह्यात धार्मिक व पर्यटन स्थळे मोठ्या प्रमाणावर असल्याने देश-विदेशातील सुमारे प्रतिवर्षी ५० लाख पर्यटक व भाविक जिल्ह्याला भेट देण्यासाठी येत असल्यामुळे पोलीस प्रशासनाला बंदोबस्त करण्यासाठी अडचणी येत असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस आयुक्त आस्थापनेसाठी शासन निर्णय दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ नुसार २३२ चारचाकी वाहने अनुज्ञेय आहेत, परंतु आस्थापनेवर ५६ वाहन चालकांची पदे मंजूर असून कमी वाहने व चालकांमुळे बंदोबस्तासाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांनी २३२ चारचाकी वाहनांसाठी वाढीव ३५५ वाहन चालकांची पदे निर्माण करण्यासाठी दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर यांचे चारचाकी वाहनांसाठी चालकांची वाढीव पदे निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयामार्फत दिनांक १२/०९/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे उक्त वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. तसेच उक्त पत्राद्वारे पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या आस्थापनेवर वाहन चालकांची एकूण ३५५ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक १२/०९/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे सादर केलेला उक्त प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले आहेत. उक्त मुद्यांची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयास दिनांक ०५/०३/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

उक्त मुद्यांची माहिती प्राप्त होताच प्रस्ताव पुन्हा वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरी पोतदार (ता.पोंभूर्णा, जि.चंद्रपूर) येथील सिमेंट बंधाऱ्याच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * २३४७५ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी पोतदार (ता.पोंभूर्णा, जि.चंद्रपूर) येथे नाला बंधारा कामासाठी जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, चंद्रपूर यांनी २९.९७ लाख रूपयांची निविदा काढून दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी कार्यारंभ करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्याकरीता निविदेनुसार ३ महिन्यांचा कालावधी असतानाही सदर काम १० दिवसांत म्हणजे दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी पूर्ण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सिमेंट बंधाऱ्याचे काम १० दिवसांत पूर्ण करुन बांधकामाच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या मृद व जलसंधारण विभागातील संबंधित अभियंत्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच गैरव्यवहार करणांऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) उमरी पोतदार (ता.पोंभूर्णा, जि.चंद्रपूर) येथील सिमेंट नाला बंधारा या कामाच्या दर्जाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, नागपूर यांना शासन पत्र दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच तक्रार अर्जामध्ये नमूद संबंधित अधिकाऱ्यांना त्यांचेशी संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने खुलासे सादर करण्याबाबत दिनांक ३०/१०/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात जिल्हा जलसंधारण अधिकारी (जि.प) ल.पा. चंद्रपूर यांनी प्राथमिक चौकशी अहवाल प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, नागपूर यांना सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने तांत्रिक तपासणीची (Non Destructive Test) प्रक्रिया सुरू असून अंतिम अहवाल प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पडीक जमिनी सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भाडे तत्वावर घेण्याबाबत

**(१४) * २३४९६ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील वीस गावांमधील शेतकऱ्यांच्या १०००० एकर पडीक जमिनीवर महापारेषण विभागाकडून ऊर्जा पारेषणाबाबत चाचणी करुन सदरहू जमीन सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भाडे तत्वावर घेण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांचेकडे दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू पडीक जमीन सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता योग्य त्या दराने भाडेतत्वावर घेण्याबाबत महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व मा.संचालक (प्रकल्प) यांचेसोबत दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास चर्चा झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आटपाडी या दुष्काळग्रस्त भागातील पडीक जमीन सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता घेतल्यास या भागातील शेतकऱ्यांचा रोजगाराचा प्रश्न दूर होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पडीक जमिनी सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भाडे तत्वावर घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक ०९ जानेवारी, २०२४ रोजी श्री.गोपिचंद पडळकर, विधान परिषद सदस्य यांचे कडून सदर विषयाबाबत महानिर्मिती कंपनीस मागणी प्राप्त झाली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय. सदर प्रकल्प उभारण्याबाबतचा भविष्यात निर्णय झाल्यास सदर प्रकल्पामुळे काही प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकते.
(४) महानिर्मिती कंपनीद्वारे प्रश्नाधीन जमिनीचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून त्याठिकाणी ३१००० हेक्टर जमीन उपलब्ध असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल, कल्याण, डोंबिवली या शहरांमध्ये शाळा परिसरात बार व मद्य विक्री सुरू असल्याबाबत

**(१५) * २३५६२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल, कल्याण व डोंबिवली या शहरांमध्ये शाळेच्या परिसरात बार व मद्य विक्री सुरू असून, तेथील मद्य विक्रीवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश मा.राज्य उत्पादन शुल्क मंत्री महोदय यांनी दिले असल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालामध्ये बार व मद्य विक्रीचे परवाने ज्या व्यक्तींच्या नावावर आहेत तेच वापर करीत असल्याची माहिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी पनवेल, कल्याण, डोंबिवली या शहरांमध्ये शाळेच्या परिसरात बार व मद्य विक्री करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

लोकमत वृत्तपत्रामध्ये दिनांक १४/०३/२०२४ रोजी ठाणे तसेच, रायगड जिल्ह्यात शाळेजवळ बार असल्याबाबतची बातमी प्रसिध्द झाली होती. या बातमीच्या अनुषंगाने तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते.
(२) व (३) होय, हे खरे आहे.

मुंबई विदेशी मद्य नियमावली, १९५३ च्या नियम ४५ (१)(सी) अन्वये धार्मिक तसेच, शैक्षणिक संस्थेपासून परमिट रुम/बार अनुज्ञप्तीचे अंतर ७५ मीटर पेक्षा कमी नसावे, अशी तरतूद आहे. तथापि, सदर नियमातील दुरुस्तीपूर्वीच्या अनुज्ञप्तींना सदर नियम लागू होत नाहीत. यानुसार वृत्तपत्रात नमुद रायगड व ठाणे जिल्ह्यातील अनुज्ञप्त्या यांची तपासणी करण्यात आली असता उक्त तरतुदीन्वये सदर अनुज्ञप्त्या अंतरनिर्बंधमुक्त आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * २३८९५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात गतवर्षी अत्यल्प प्रमाणात पाऊस पडल्यामुळे सुमारे ४०० पेक्षा अधिक गावांतील नागरिकांना मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंचन आयोगानुसार मराठवाड्यात २६० टीएमसी पाण्याची तूट असून शासनाने १५.५ टीएमसी क्षमतेचे ३ प्रकल्प मराठवाड्यासाठी मंजूर केले परंतु त्याबाबत अद्यापि कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसून सदरहू प्रकल्पाचे पाणी सिन्नर व नाशिक भागास देण्यात येणार आहे तसेच शासनाने वॉटर ग्रीड प्रकल्पास गती देण्याचे काम केले परंतु प्रत्यक्षात कामास सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी १५.५ टीएमसी क्षमतेच्या ३ प्रकल्पांमधील पाणी गोदावरी नदीत सोडावे, नाशिक येथील मुख्य अभियंत्यांचे कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे सुरु करणे तसेच मराठवाड्यातील सिंचनासाठी नाशिक जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या मुकणे, भाम, भावली व वाकी या धरणाशी वॉटरग्रीड योजना जोडण्यात यावी, अशा विविध मागण्या शासनाकडे करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने मराठवाड्यातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

त्यानुषंगाने मराठवाड्यातील प्रकल्पांवर संबंधित जिल्हाधिकारी यांचे मागणीनुसार पिण्यासाठी एकूण ३१२.९७ दलघमी पाणी आकस्मिक आरक्षणाव्दारे राखीव ठेवण्यात आलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक १९/०९/२०१९ अन्वये दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी व पार-गोदावरी हे नदीजोड प्रकल्प राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनांद्वारे एकात्मिक राज्य जलआराखड्यानुसार १५.५ अघफू (TMC) पाणी पश्चिम वाहिनी (कोकणातून) खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित आहे.

दमणगंगा-एकदरे-गोदावरी,दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व पार-गोदावरी उपसा सिंचन योजना या योजनांचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे छाननी करीता सादर केला आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडून छाननी झाल्यावर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांची मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे. तद्नंतर प्रकल्पाच्या प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव महामंडळाकडून शासनास सादर करणेत येईल.

पाणीपुरवठा व स्वछता विभागाकडून वॉटर ग्रीड प्रस्ताव दिनांक २७/४/२०२३ रोजी राष्ट्रीय जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मंजुरीस्तव केंद्र शासनास सादर केलेला आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) मंजूर सर्वसाधारण आराखड्यानुसार (कोकण) पश्चिम वाहिनी खोऱ्यातील अतिरिक्त उपलब्ध पाणी पार-गोदावरी नदीजोड योजना, दमणगंगा-एकदरे-गोदावरी व दमणगंगा- वैतरणा-गोदावरी (कडवा-देवनदी) या ३ प्रकल्पांच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यातील तुट भरुन काढणे प्रस्तावित आहे.

उपरोक्त तीनही नदीजोड योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती यांच्याकडुन छाननी होऊन प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्याचे काम प्रगतीत आहे.

नदीजोड योजनांचे अन्वेषण, परिनिरीक्षण व संकल्पन या करीता मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था व राष्ट्रीय जलविकास अभिकरण ही मुख्य कार्यालये नाशिक येथे कार्यरत आहेत. तसेच क्षेत्रिय कामकाजाच्या दृष्टीने योजनांचे क्षेत्रिय स्थळी पाहणी करणे, भेटी देणे व आवश्यक त्या मंजूरी देणे या प्रक्रिया मुख्य अभियंता, नदीजोड प्रकल्प कार्यालय नाशिक येथे असल्याने जलद गतीने होतील, ही बाब लक्षात घेता मुख्य अभियंता कार्यालय नाशिक येथे असणे आवश्यक आहे.

मुकणे, भाम, भावली व वाकी या धरणाशी वॉटरग्रीड योजना जोडण्याबाबत निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तंटामुक्त समित्या पुनर्जिवित करण्याबाबत

**(१७) * २३७८२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गावांचा विकास झाला पाहिजे, गावातील प्रश्न देखील त्याच ठिकाणी सोडविता आले पाहिजेत व गावातील लोकांना भांडणापासून व पर्यायाने गुन्ह्यांपासून परावृत्त करण्याच्या चांगल्या हेतूने शासनाने माहे सप्टेंबर, २००८ मध्ये वा त्यासुमारास महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान मोहिमेअंतर्गत

तंटामुक्त समित्यांची स्थापना केली असून याबाबत महसूल व पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी बैठका व आढावा घेणे, गावात शांतता राखणे, गावातील भांडणे गाव स्तरावर मिटविणे ही प्रमुख कामे सदर समितीमार्फत होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात काही गावातील तंटामुक्त समित्या फक्त कागदावर असून सद्य:स्थितीत गावोगावी तंटयांचे प्रमाण वाढले असल्याने सदर समित्यांमार्फत गावांमधील शांतता निर्माण होणेकामी उदासीनता दिसून येत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तंटामुक्त समित्यांना महसूल व पोलीस प्रशासन यांच्यामार्फत समित्या कार्यरत करण्यासाठी आदेश देऊन महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेंतर्गत जनजागृती अभियान राबविण्याबाबत तसेच समित्यांना नवसंजीवनी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

गाव पातळीवरील अस्तित्वातील तंटे सामोपचाराने मिटविले जावेत आणि भविष्यात तंटे निर्माण होणार नाहीत, यादृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना अंमलात आणून शांततापूर्ण रचनात्मक समाजाची जडणघडण व्हावी, या महत्वाकांक्षी भूमिकेतून राज्य शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त गाव ही अभिनव योजना राज्यात दिनांक १९जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून सुरु केली.

सदर शासन निर्णयानुसार सर्व ग्रामपंचायतींना तंटामुक्त समिती स्थापन करणे अनिवार्य होते. गावांमधील तंटे गावांमध्येच मिटविणे, जातीय व धार्मिक सलोखा राखणे, सामाजिक व राजकीय सलोखा राखणे आणि अनिष्ट चालिरीती व प्रथांचे निर्मुलन करणे याकरीता आवश्यक तेथे महसूल विभागाचे अधिकारी/ कर्मचारी, पोलीस अधिकारी, बीट अंमलदार, प्रशासकीय यंत्रणा व कायदेतज्ञ यांच्यासोबत बैठका घेवून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ही तंटामुक्त समितीची कार्ये आहेत.
(२) हे खरे नाही.

तंटामुक्त समितीमार्फत गाव पातळीवरील अस्तित्वातील तंटे सामोपचाराने मिटविले जावेत आणि भविष्यात तंटे निर्माण होणार नाहीत, यादृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची कार्यवाही करण्यात येते.
(३) व (४) महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम अभियान योजनेंतर्गत राज्यातील २७,५५६ ग्रामपंचायतींपैकी तंटामुक्त झालेल्या १८,९८९ ग्रामपंचायतींना ‘तंटामुक्त गाव पुरस्कार’ देण्यात आले आहेत. महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम अभियान योजनेंतर्गत पुरस्कारप्राप्त गावांना पुन्हा पुरस्कार अनुज्ञेय नाही. यास्तव गाव पातळीवरील समित्यांना योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यास्तव प्रोत्साहन देण्यास्तव काही सुधारणासंह योजनेची नव्याने अंमलबजावणी सुरु करण्याचे विचाराधीन आहे.

-----------------

## अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील अनेक गावे वीज जोडणीपासून वंचित असल्याबाबत

**(१८)** * **२३७६४ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील २७ गावे (पाडे) व धडगाव तालुक्यातील १८५ गावे (पाडे) हे पारंपारिक वीज जोडणी पासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू गावांना पारंपारिक वीज जोडणी नसल्याने अपारंपरिक पध्दतीने वीज जोडणीकरीता कार्यवाही करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी हिवाळी अधिवेशन, २०२३ मध्ये सभागृहात केली असून महाऊर्जा यांचे मार्फत सदर परिसराचा अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अक्कलकुवा (जि.नंदुरबार) तालुक्यातील उक्त गावांना (पाड्यांना) पारंपारिक अथवा अपारंपारिक पध्दतीने वीज उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील ५ गावे व २३० पाडे आणि धडगाव तालुक्यातील ३१ गावे व १८५ पाडे यांना सद्य:स्थितीत अपारंपारिक पध्दतीने वीजपुरवठा सुरु असून त्यांचे पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्याचे काम महावितरणमार्फत नियोजित आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,

सदर परिसराचा अहवाल महाऊर्जा मार्फत तयार करण्यात आलेला नसून, सदर परिसरातील ४१५२ सौर घरगुती दिवे आस्थापित घरांचे पारंपारिक पध्दतीने जोडणी करण्याबाबतचा अहवाल (DPR) महावितरणमार्फत सादर केला आहे.
(३) नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील ५ गावे व २३० पाडे आणि धडगाव तालुक्यातील ३१ गावे व १८५ पाडे यांना सद्य:स्थितीत अपारंपरिक पध्दतीने वीजपुरवठा सुरु असून त्यांचे पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्याचे काम नियोजित आहे. अक्कलकुवा तालुक्यातील ५ गावे व २३० पाडे आणि धडगाव तालुक्यातील ३१ गावे व १८५ पाडे यांच्यासह नंदुरबार जिल्ह्यातील एकूण ३४०८९ घरांचे पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्याबाबतचा रुपये ३९८.९५ कोटीचा प्रस्ताव महावितरणमार्फत शासनास प्राप्त झाला होता.त्यास शासन निर्णय दिनांक २६/०२/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, शासनामार्फत रुपये ३७.१६ कोटी निधी माहे मार्च-२०२४ अखेर महावितरण कंपनीस देण्यात आला असून, त्यामध्ये धडगाव तालुक्यातील ९ गावे (भाबरी, बादल, जापी, सिदीदिगर, सावऱ्या, केलापाणी, खडकी, कुंड्या,फलई) ५८ वाडीपाडे व त्यामधील ३४९६ घरगुती वीज जोडण्या यांना पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्याबाबतची निविदा प्रक्रिया महावितरण कंपनीकडे प्रगतीपथावर आहे. तसेच, अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील एकूण २७ गावे, ३५७ वाडीपाडे व त्यामधील २५,९२४ घरगुती वीज जोडण्या यांच्या पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरणाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अहमदनगर शहरात प्रधानमंत्री आवास योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * २२९७१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरात प्रधानमंत्री आवास योजनेची कामे विविध कारणांनी प्रलंबित असल्यामुळे १४३४ लाभार्थी घरकुलांपासून वंचित असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केडगाव, आगरकर मळा व मालेगाव येथे घरकुल प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबवून देखील व ठेकेदाराला कार्यारंभ आदेश देऊनही ठेकेदाराने काम सुरू केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत संजय नगर येथील २९८ पैकी केवळ ३६ घरे पूर्ण झाली असून २६५ घरांची कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेली कामे पूर्ण करुन घरकुल योजनेंतर्गत घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत AHP घटकांतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील केडगांव येथील ६२४ घरकुलांचा, नालेगाव येथील २१६ घरकुलांचा तसेच आगरकरमळा येथील ५९४ घरकुलांचा असे एकूण १४३४ घरकुलांचे तीन प्रकल्प अहमदनगर महानगरपालिकेने रद्द करण्याचे प्रस्तावित केल्याने केंद्रीय मान्यता संनियंत्रण समितीच्या(CSMC) दिनांक १०/०५/२०२३ च्या बैठकीमध्ये मध्ये सदर प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत.

(२) केडगांव, नालेगांव येथील नियुक्त कंत्राटदारांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करुन त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. तसेच आगरकरमळा येथील कामासाठी तीन वेळा निविदा प्रसिध्द करुनही निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.

(३) (४) व (५) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेमार्फत २९८ घरकुलांचा प्रकल्प सुरु आहे. कोविड-१९ मध्ये सदर प्रकल्पाचे काम बंद होते. सद्य:स्थितीत ३३ सदनिकांचे काम पूर्ण झाले असून त्याचा लाभार्थ्यांना ताबा देण्यात आला आहे.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यात कोंढाणे धरणासाठी करण्यात आलेल्या भूसंपादनाचा मोबदला आदिवासी शेतकऱ्यांना न मिळाल्याबाबत

**(२०) * २३२४६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनामार्फत सन २०११ मध्ये कोंढाणे धरण (ता.कर्जत, जि.रायगड) येथे मंजूर करण्यात आले असून, सदर धरण परिसरात असलेल्या आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे कोणतेही भूसंपादन न करता सिडकोने तेथे मोठे खड्डे खोदून बारा वर्षे झाले असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोने खोदलेल्या आदिवासींच्या शेतजमिनीमधील खड्ड्यांमध्ये पावसाळयात असंख्य गुरे पडून वाहून जात असल्याचे निदर्शनास आले असून धरणग्रस्तांच्या नादुरुस्त शेतजमिनीची नुकसान भरपाई देण्याबाबत सिडकोकडे अनेकवेळा मागणी करुनही अद्याप सिडकोकडून कोणतीही नुकसान भरपाई देण्यात आलेली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरण सिडकोकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला असून सिडकोकडून कोंढाणे धरण क्षेत्रातील जमिनीची भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तसेच भूसंपादनाचा मोबदला आणि आजपर्यंत वापरण्यात आलेल्या जमिनीची नुकसान भरपाई आणि भू भाडे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०११ मध्ये कोंढाणे धरणाचे काम कोकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत ठेव तत्वावर सुरु करण्यात आले होते. त्यावेळी बुडीत क्षेत्रात धरण बांधकामासाठी लागणारी माती उत्खनन केलेले आहे. माती उत्खनन करताना शेतकऱ्यांची संमती घेण्यात आलेली आहे. सन २०१२ मध्ये प्रशासकीय बाबींमुळे सदर धरणाचे काम बंद पडल्याने सदर ठिकाणचे भूसंपादन प्रलंबित राहिलेले आहे व सन २०१८ मध्ये प्रकल्प सिडको विभागाकडे हस्तांतरण करण्यात आला आहे.
(२) होय.
(३) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१६/ (३१२/२०१६), दिनांक १८/०८/२०१७ व शासन शुध्दिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१६/ (३१२/२०१६), दिनांक ०४/१०/२०१७ अन्वये कोंढाणे प्रकल्प सिडकोकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यानुसार भूसंपादनाची प्रक्रिया सिडकोमार्फत सुरु आहे.

कोंढाणे प्रकल्पाचा मौजे चोची व कोंढाणे या गावातील ४९.९७१ हेक्टर जमिनीचा दिनांक २०/१०/२०११ ते दिनांक ३१/०३/२०२८ या कालावधीपर्यंतचा ५% प्रमाणे रुपये ५६,९२,९४६/- रक्कमेचा भूभाडे प्रस्ताव प्रदेश कार्यालयाच्या दिनांक १९/०५/२०२३ च्या पत्रान्वये मंजूर करण्यात आला आहे. सदर भूभाडे मावेजा अदायगी करणेसाठीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भटक्या विमुक्त समाजातील आश्रमशाळांना निधी मिळणेबाबत

**(२१) * २३४३५ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भटक्या विमुक्त समाजातील मुलांसाठी असलेल्या आश्रमशाळांना प्रति विद्यार्थी प्रति महिना १५०० रुपये अनुदान दिले जाते, सध्या आश्रम शाळा आर्थिक संकटात सापडल्या असून त्यांना सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे अंतिम अनुदान तसेच सन २०२३-२४ चे ६० टक्के अनुदान प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना मिळणारे अनुदान अत्यंत अपुरे असून महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे प्रति विद्यार्थी प्रति महिना ३ हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अशी आश्रमशाळा संस्थाचालक संघाची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी भटक्या विमुक्त समाजातील मुलांसाठी असलेल्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे प्रलंबित असलेले अनुदान देण्याबाबत तसेच अनुदान वाढवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०२२-२३ ते सन २०२३-२४ या कालावधीत क्षेत्रिय कार्यालयांच्या मागणीनुसार राज्यातील आश्रमशाळांना खालीलप्रमाणे वेतनेतर अनुदान अदा करण्यात आले आहे.

| आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पिय तरतूद (रुपये कोटी) | सुधारीत अंदाज (रुपये कोटी) | प्रत्यक्ष खर्च (रुपये कोटी) |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | २००.०० | १४०.०० | १४०.०० |
| २०२३-२४ | २२५.०० | २७५.०० | २९५.५७ |

सद्य:स्थितीत विभागीय स्तरावरील माहितीनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील रुपये २४.७३ कोटी तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील रुपये ९०.६९ कोटी असे एकूण रुपये ११५.४२ कोटी इतके वेतनेतर अनुदान प्रलंबित असून त्यासाठी निधी उपलब्धेकरीता वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. संबंधित संस्थानी मागील वर्षातील आश्रमशाळांचे वेतनेतर अनुदान खर्चाचे विवरण (Assessment) विलंबाने सादर केल्याने ते उपलब्ध करुन तपासण्यात येत आहे. ज्या संस्थाकडून Assessment प्राप्त झाले त्यांना तातडीने अनुदान अदा करण्यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूदी व्यतिरिक्त पुरवणी मागणीद्वारे रुपये ५०.०० कोटी व पुर्नविनियोजनाद्वारे २०.५७ कोटी असे एकूण रुपये ७०.५७ कोटी इतका अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सन २०२४-२५ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीपैंकी बिम्स प्रणालीवर प्राप्त रुपये ६६.६६ कोटी इतका निधी परिपोषण अनुदानापोटी आगावू खर्चासाठी वित्त विभागाच्या सहमतीने वितरित करण्याचे प्रस्तावित आहे.

आश्रमशाळातील परिपोषण अनुदान वाढीच्या अनुषंगाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीसमोर आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागासाठी एकत्रितरित्या धोरणात्मक निर्णयासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात १७ हजार पोलीस शिपायांच्या भरतीबाबत

**(२२) * २३१०५ श्री.अरुण लाड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १७ हजार पोलीस शिपायांची भरती तसेच मुंबईत साडेतीन हजार पोलीस पदांसाठी भरती करण्याची घोषणा माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणेच्या अनुषंगाने अद्यापही प्रत्यक्ष पोलीस शिपाई पदासाठी जाहिरात काढण्यात आली नसल्यामुळे राज्यातील बेरोजगारांमध्ये नाराजीची भावना पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वेळोवेळी पोलीस भरतीची घोषणा करुनही अद्याप त्याची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे अनेक उमेदवारांचे वय वाढत असून वयोमर्यादेची अट शिथिल करण्याची मागणीसुध्दा करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पोलीस पदासाठी त्वरीत परीक्षा घेऊन बेरोजगार तरुणांना संधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) शासन निर्णय दिनांक ३१/०१/२०२४ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई संवर्गाची १७,४७१ रिक्त पदे १०० टक्के भरण्यास वित्त विभागाच्या दिनांक ३०/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींमधून सूट देण्यात आली आहे. सदरहू पदे भरण्याच्या अनुषंगाने विविध पोलीस घटकांमार्फत दिनांक २९/०२/२०२४ व दिनांक ०१/०३/२०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. दिनांक ०५/०३/२०२४ ते दिनांक १५/०४/२०२४ या कालावधीमध्ये ऑनलाईन आवेदन अर्ज स्वीकारण्यात आले असून १७,७६,२५६ इतके ऑनलाईन आवेदन अर्ज प्राप्त झाले आहेत.

(४) दिनांक १९/०६/२०२४ पासून संबंधित घटकांमार्फत शारीरिक चाचणी घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यात बनावट जीएसटी अधिकारी असल्याचे सांगून व्यापाऱ्याची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केलेबाबत

**(२३) * २३७२७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात बनावट जीएसटी अधिकारी असल्याचे सांगून पंजाब येथील व्यापारी कश्मिरसिंग बाजवा यांची ४ कोटी रुपयांची फसवणुक केल्याबाबतची बाब दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी जीएसटी अधिकारी असल्याचे भासवून व्यापाऱ्याची फसवणूक झाली आहे. तथापि, सदरची घटना दिनांक १७/११/२०२३ रोजी घडली असून रुपये १,३०,०००/- रकमेची फसवणूक झाली आहे.

(२) सदर प्रकरणी आझाद नगर पोलीस ठाणे, जि.धुळे येथे गु.र.नं. ०२/२०२४ भा.दं.वि. कलम ४१९, ४२०,३४१,१७०,१७१,३४ प्रमाणे दिनांक ०४/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १० आरोपी निष्पन्न झाले असून ४ आरोपींना अटक करण्यात आले आहे. या गुन्ह्याचा तपास दिनांक ०७/०३/२०२४ रोजीच्या आदेशान्वये गुन्हे अन्वेषण विभागाकडे हस्तांतर करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये रुपये १,२०,०००/- ची रक्कम आरोपींकडुन हस्तगत करुन मा.न्यायालयाच्या आदेशान्वये फिर्यादी यांना परत करण्यात आली आहे. गुन्ह्यात ४ आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच या गुन्ह्यात अटक २ लोकसेवक आरोपी यांच्याविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडुन सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबईतील आठ महिला शिपायांवर त्यांच्या विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी लैंगिक शोषण केल्याप्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(२४) * २३१६८ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपाडा येथील मोटार परिवहन विभागामध्ये कार्यरत असलेल्या आठ महिला पोलिसांनी त्यांच्यावर पोलीस उपायुक्तांसह दोन पोलीस निरीक्षक आणि तीन पोलीस हवालदार यांनी लैंगिक अत्याचार केल्याची बाब माहे मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आठ महिला पोलीस शिपायांनी त्यांच्याच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून त्यांचे अनेकदा लैंगिक शोषण होत असल्याची तक्रार केली असून याप्रकरणाची सीबीआय, सायबर सेल मार्फत चौकशी करण्याबाबतची मागणी दिनांक ७ जानेवारी, २०२४ रोजीच्या पत्राद्वारे मुंबई पोलीस आयुक्तांकडे केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कठोर कारवाई करुन या प्रकरणाची पृनरावृत्ती होवू नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

नागपाडा मोटार परिवहन विभागातील कार्यरत असलेल्या आठ महिला पोलीसांनी त्यांच्यावर पोलीस उपायुक्तांसह दोन पोलीस निरीक्षक आणि तीन पोलीस हवालदार यांनी लैंगिक अत्याचार केला असल्याबाबत सोशल मिडीयावर बातमी प्रसारीत होती. परंतु चौकशीअंती लैंगिक अत्याचाराचा असा कोणताही प्रसंग महिला पोलीसांवर घडला नाही असे निष्पन्न झाले आहे.

तसेच सदर प्रकरणी महिला पोलीसांच्या बनावट सहीचा वापर करुन बनावट तक्रार अर्ज सोशल मिडीयावर प्रसारीत करुन पोलीस महिलांची बदनामी व फसवणूक केली म्हणून नमूद आठ महिला पोलीस अंमलदारांपैकी एका महिला पोलीस अंमलदार यांचे फिर्यादीवरुन नागपाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.२५/२०२४, कलम ४६५, ४६८, ४६९, ४७१, ५००, ५०९, १६७, ३४ भा.दं.वि. सह पोलीस (अप्रितीची भावना चेतवणे) अधिनियम १९२२ चे कलम ३ सह कलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये दिनांक ०८/०१/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा तपासाधीन आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदीच्या पूर नियंत्रण रेषेच्या नियमांमध्ये बदल करण्याबाबत

**(२५) * २३३३० श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हास नदीच्या पूर नियंत्रण लाल व निळी रेषेच्या मुद्द्यावर पूररेषा बाधित शेतकरी संघर्ष समितीने महानगरपालिकेसमोर साखळी उपोषण केले असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूरनियंत्रण रेषेत बाधित झालेले शेतकरी, भूमिपुत्र, व्यावसायिक व रहिवाशांनी या आंदोलनात सहभाग घेतला असून शासनाने जाचक असलेल्या पूर नियंत्रण रेषेच्या नियमांमध्ये बदल करण्याचा निर्णय न घेतल्यास उपोषण तीव्र करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उल्हास नदीची पूर नियंत्रण रेषा दिनांक ११ जून २०२० रोजी अंतिम करून ती जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केली असून त्यामध्ये इमारती बांधकामांना परवानगी नाकारणे, इमारतीचा पुनर्विकास करण्याची परवानगी दिलेल्या इमारतींना टीडीआर वापरण्याचा अधिकार मिळत नसून, शासनाकडे जीर्ण झालेल्या इमारतींचा पुनर्विकास तसेच स्वखर्चाने इमारतींचा पुनर्विकास करण्याकरीता अनेक सोसायटीची परिस्थिती नसणे अशा मागण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उल्हास नदीच्या पूररेषा बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १४/०३/२०२४ रोजी पूररेषा बाधित शेतकरी संघर्ष समितीने कुळगांव बदलापूर नगरपरिषदे समोर साखळी उपोषण केले होते.

(२) होय.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील मेरी नाशिक यांच्या दिनांक १६/११/२०१५ च्या तांत्रिक मार्गदर्शक तत्वानुसार उल्हास नदीच्या पूर रेषा आखणीचे काम करण्यात आले असून सदर नकाशे महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळावर दिनांक ११/०६/२०२० रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेले

आहेत. नदीच्या पात्राच्या सद्य:स्थितीनुसार नदीची पूर वहनक्षमता निर्धारीत केली जाते व त्याच्याआधारे पूररेषा निश्चित केल्या जातात, जेणेकरून पूराचा तडाखा नदीकाठावरील नागरी वस्ती व शेतजमिनीला होणार नाही. सदर पूररेषांची आय.आय.टी. रुरकी मार्फत पडताळणी करण्याच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीच्या पुनर्विकासाबाबत

**(२६) * २३४५१ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगर झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि एमएमआरडीए मध्ये संयुक्त करार करण्यात आला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माता रमाबाई आंबेडकर झोपडपट्टीतील हजारो रहिवाशांच्या पात्रता निश्चितीसाठीचे सर्वेक्षण सुरू केले जाणार असून या झोपडपट्टीत असणाऱ्या नागरिकांसाठी पुनर्वसित इमारती तयार झाल्यानंतर पात्र रहिवाशांना घराचा ताबा देण्याची जबाबदारी झोपू प्राधिकरणाची असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारती पूर्ण होण्याकरीता बराच कालावधी लागणार असल्याने माता रमाबाई नगरातील रहिवाशांचे तात्पुरते स्थलांतर करण्यासाठी झोपडपट्टी प्राधिकरणाने कोणती व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पातील झोपडीधारकांचे सर्वेक्षण करुन पात्रता निश्चित करण्याची कार्यवाही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारी यांचेमार्फत सुरु आहे. सदर प्रकल्प MMRDA यांच्याकडून राबविण्यात येणार असल्याने रहिवाशांना ताबा देण्याची जबाबदारी MMRDA ची आहे.

(३) सदर रहिवाशांचे तात्पुरते स्थलांतर करण्यात येणार असून पात्र रहिवाश्यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत घरभाडे देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगपूर (ता.केज, जि.बीड) येथील १४ वर्षीय विद्यार्थीनीच्या आत्महत्या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत

**(२७) * २३१९० श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगपूर (ता.केज, जि.बीड) येथील आठवीच्या वर्गात शिकणारी विद्यार्थीनी शाळेत जात-येत असताना टवाळखोर मुलांनी दगड मारुन अश्लील भाषेत संवाद करीत असल्यामुळे त्या मुलीने विषारी द्रव्य प्राशन करुन आत्महत्या केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या टवाळखोर मुलांना विद्यार्थीनीच्या पालकांनी अनेक वेळा समजावून असे न करण्याबाबत विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीच्या अनुषंगाने सदर विद्यार्थीनीच्या मृत्यूस जबाबदार संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) शाळेत व परीक्षेस जात-येत असताना दोन अल्पवयीन मुलांनी छेडछाड करून त्रास दिल्याने औरंगपूर (ता.केज, जि.बीड) येथील आठवीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थीनीने दिनांक ०५/०४/२०२४ रोजी विषारी द्रव्य प्राशन करुन आत्महत्या केली.
(२) सदर छेडछाडीबाबत विद्यार्थिनीच्या पालकांनी विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या पालकांना माहिति देऊन मुलांना असे न करण्याबाबत समजावून सांगितले होते.
(३) या प्रकरणी युसुफ वडगाव पोलीस स्टेशन, ता.केज जिल्हा बीड येथे गु. र. क्र. ८५/२०२४, कलम ३०५, ५०६, ३४ भा. द. वि. अन्वये दिनांक १२/०४/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यातील अटक दोन्ही विधीसंघर्षग्रस्त मुलांना बालसुधारगृहात ठेवण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना लवाद निवाड्यांची रक्कम अदा करणेबाबत

**(२८)** * **२३७२६ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील LCB ५४ (कोठाळा शाखा कालवा) व LCB ५१ (माजलगाव कालवा) लवाद निवाड्यांची रक्कम गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना अदा करणेबाबत महाअधिवक्ता यांचा सल्ला घेऊन नियामक मंडळात निर्णय घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी आदेश देऊनही कार्यवाही न झाल्याने शासनाच्या तिजोरीवरचा भार वाढत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्चाधिकार समिती ज्यासंदर्भात गठीत केली आहे, त्यासाठी विधी व न्याय विभागामार्फत महाअधिवक्ता यांचा सल्ला घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्यांची मुदत दिली असल्याने महाअधिवक्ता यांचा सल्ला घेऊन उच्चाधिकार समितीने आपल्या निर्णयाबद्दल फेरविचार करणे आणि नियामक मंडळात निर्णय घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार LCB ५४ (कोठाळा शाखा कालवा) व LCB ५१ (माजलगांव कालवा) या लवाद निवाड्यांची रक्कम, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना अदा करणे बाबत महाअधिवक्ता यांचा सल्ला घेऊन नियामक मंडळात निर्णय घेण्याबाबत मा.मुख्यमंत्री कार्यालय यांचे कुठलेही निर्देश प्राप्त झालेले नाहीत. स्थानिक स्पर्धात्मक निविदा LCB ५१ सन १९८९-९०, LCB ५४ सन १९९०-९१ या प्रकरणी दिनांक १६/०५/२०१८ रोजी मा.प्रधान सचिव जलसंपदा यांचे समवेत तडजोड करावी अथवा नाही याबाबत बैठक झाली असून, बैठकीत, "सदर प्रकरणी शासन स्तरावरील मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/०३/२०१७ व दिनांक २९/०५/२०१७ रोजी क्लेम समितीच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आले. सदर समितीमध्ये या प्रकरणी तडजोड न करता न्यायालयामध्ये प्रकरण चालवावे, असा निर्णय झाला आहे. सदर दोन्ही प्रकरणी तज्ञ, अनुभवी व निष्णांत वकील (Senior Counsel) लावून न्यायालयात प्रकरण मेरिटवर चालविणे योग्य राहील." असे ठरले आहे.या नंतर महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे परिपत्रक क्रमांक. ४६५-२०२२/संकीर्ण/ई शाखा दिनांक: १७ जानेवारी २०२३ नुसार LCB ५४ (कोठाळा शाखा कालवा) या प्रकरणात गठीत उच्चाधिकार समितीने मा.सर्वोच्च न्यायालयात सदर प्रकरण मेरीटवर चालवण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला असून मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

LCB ५४ (कोठाळा शाखा कालवा) या प्रकरणात दिनांक ०६/१२/२०२२ रोजी उच्च न्यायालयाने लवादकाचा निर्णय कायम ठेवल्याने सदर निकालाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याचे महामंडळाचे कायदा सल्लागार व प्रकरणात नियुक्त वकील यांनी अभिप्राय दिले आहेत. महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे परिपत्रक क्रमांक. ४६५-२०२२/संकीर्ण/ई शाखा दिनांक: १७ जानेवारी २०२३ नुसार मा.सर्वोच्च न्यायालय येथे SLP (C) १६६७०/२०२३ दाखल करण्यात आली आहे.

(३) LCB ५४ प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालय येथे वरिष्ठ विधीज्ञ यांचेमार्फत याचिका SLP(C)१६६७०/२०२३ चालवण्यात येत असून, सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवाद निवाड्याची रक्कम रुपये ८३६१.९ लक्ष परभणी जिल्हा न्यायालयात जमा करण्यातआली आहे. न्यायालयात भरणा केलेली संपूर्ण रक्कम कंत्राटदाराने उचलली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल SLP(C) १६६७०/२०२३ या प्रकरणात पुढील तारीख १८/०७/२०२४ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलाच्या "ड" श्रेणीतील कर्मचाऱ्यांना पोलिसांप्रमाणे पगार, भत्ते आणि सुविधा मिळत नसल्याबाबत.

**(२९) * २३५२५ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलाचे (एस आर पी एफ) स्वयंपाकी, न्हावी, सफाई कामगार, धुलाई इत्यादी श्रेणीतील कर्मचारी त्यांच्या कुटुंबापासून दूर राहून पोलिसांसोबत सेवा करूनही त्यांना पोलिसांप्रमाणे पगार, भत्ते आणि सुविधा मिळत नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसआरपीएफ वर्ग 'ड' चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून या कर्मचाऱ्यांना राज्य राखीव पोलीस कर्मचाऱ्यांप्रमाणेच पगार, भत्ते आणि सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या कर्मचाऱ्यांना सर्व शासकीय सुविधांचा लाभ, कॅशलेस वैद्यकीय सुविधा आणि अधिकृत गणवेश व स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण आदी सुविधा देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलातील स्वयंपाकी, न्हावी, सफाईगार इत्यादी "ड" संवर्गातील कर्मचारी यांना शासन मान्यतेप्रमाणे अनुज्ञेय असणारे वेतन व भत्ते अदा करण्यात येतात. तसेच नक्षल भागात कार्यरत असणाऱ्या राज्य राखीव पोलीस दलातील "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांना पोलीसांप्रमाणे दिडपट दराने प्रवासभत्ता, राशनभत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलातील "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांमध्ये यासंदर्भातील तीव्र नाराजी बाबतचा कोणताही विनंती अर्ज /तक्रार अर्ज अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे कार्यालयीन अभिलेख्यामध्ये दिसून येत नाही.
(३) पोलीस दलातील अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियांकरीता राबविण्यात येत असलेल्या "महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा" लाभ महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलातील न्हावी, धोबी, भोजनसेवक व सफाईगार या गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. कर्मचाऱ्यास तातडीच्या उपचाराकरीता आवश्यकता असल्यास पोलीस कल्याण निधीमधून मदत उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच कर्मचाऱ्यांना प्रत्येक २ वर्षातून ३ गणवेश गट भांडार मार्फत देण्यात येतात व त्यांच्या कामकाजानुसार आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मे. मेरेडीयन रिएलटर्स प्रा. लि. या विकासकाने जोगेश्वरी (पश्चिम) येथील १३९ गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(३०) * २२९२७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे. मेरेडीयन रिएलटर्स प्रा. लि. या विकासकाने जोगेश्वरी (पश्चिम) येथील मे.मेरेडीयन हाइटस या गृहनिर्माण प्रकल्पात सदनिका देण्याचे आमिष दाखवून ४५ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी १३९ सदनिका गुंतवणूकदारांनी अंबोली पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४२०, ४०९,४०६,३४ अंतर्गत विकासकावर गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले चौकशीच्या अनुषंगाने सदनिका गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदनिका गुंतवणूकदारांना सदनिका मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ०७/०९/२०२३ रोजी, गु.र.क्र.६७९/२०२३, कलम ४२०, ४०९, ४०६, ३४ भा.द.वि. सह कलम, ३, ५, १३ मोफा ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे. (आ.गु.वि. गु.र.क्र. ४८/२०२३ कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ भा. द. वि. सं. सह कलम ३,४,५,७ व १३ मोफा ॲक्ट)
(२) व (३) सदर गुन्ह्यातील आरोपीतांविरुध्द लुक आऊट नोटीस इश्यु करण्यात आले आहे. सदर आरोपीतांनी मा.सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी सादर केलेला अर्ज प्रलंबित असून मा.न्यायालयाने तपासी अधिकाऱ्यांना पुढील तारखेपर्यंत अर्जदाराविरुध्द प्रतिकूल निर्णय घेऊ नये असे आदेशित केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाच्या कोकण मंडळाच्या विरार-बोळींज प्रकल्पातील ५,१९४ घरांची विक्री झाली नसल्याबाबत

**(३१) * २२९१८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडाच्या कोकण मंडळाने विरार-बोळींजमध्ये १० हजार घरांचा प्रकल्प उभारला असून सद्य:स्थितीत या प्रकल्पातील ५,१९४ घरांची विक्री झाली नसल्याची बाब दिनांक २१ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाने या घरांसाठी वारंवार सोडत काढूनही घरांना प्रतिसाद मिळत नाही, तसेच सदरहू घरे रिकामी असल्याने त्यांच्या देखभाल दुरुस्तीचा भार म्हाडाला सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, म्हाडाच्या कोकण मंडळाच्या विरार-बोळींजमधील घरांची विक्री होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) म्हाडाच्या कोंकण मंडळाद्वारे विरार-बोळींज येथे आजमितीपर्यंत ९१६४ सदनिका बांधण्यात आल्या असून सप्टेंबर, २०२३ अखेरपर्यंत एकूण ६ वेळा सोडत (Lottery) काढली आहे.

सदर जाहिरातीस प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने त्यास दिनांक ०२/०५/२०२४ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ व दिनांक ०१/०६/२०२४ रोजीपर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात येऊनसुध्दा प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. सदर रिक्त गाळयासाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (FCFS) ही योजना सुरु असून या योजनेंतर्गत मार्च, २०२४ अखेर पासून आजतागायत एकूण ६४४ गाळयांची विक्री झालेली असून आज अखेर एकूण ४५५० सदनिका रिक्त आहेत, सदर सदनिका विक्रीसाठी म्हाडाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## खामला (ता.धडगांव, जि.नंदुरबार) येथील आदिवासी कुटुंबावर पोलिसांनी खोटे गुन्हे दाखल केल्याबाबत.

**(३२) * २३३६९ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामला (ता.धडगांव, जि.नंदुरबार) येथील आदिवासी व्यक्तीच्या घरात दिनांक २ डिसेंबर, २०२२ रोजी धडगांव पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी अचानक झडती घेऊन, आदिवासी कुटुंबियांच्या अशिक्षित पणाचा फायदा घेऊन त्यांच्या घरातील चांदीचे दागिने व रोख रक्कम असे एकूण २० लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेऊन त्यांचे पंचनामे न करता त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी बांधवांचा उदरनिर्वाह हा महुच्या फुलांवर अवलंबून असतो, तसेच आदिवासींच्या जाती-रिवाजामध्ये कुटुंबातील एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्यास, लग्न किंवा दहाव्याचे कार्यक्रम, पुजापाठ असल्यास महु फुलांची दारु घरात ठेवण्यास त्यांना कायद्यानुसार परवानगी असूनही व विशेषत: १९७५ च्या कायद्यात धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील आदिवासी कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी महूच्या फुलांचा व्यवसाय करण्याची तरतूद असतानाही उक्त आदिवासी व्यक्तींवर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खामला येथील आदिवासी कुटुंबियांनी चांदीचे दागिने व पैसे परत मागितले असता ते परत करण्यास पोलीस टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी मा.गृह मंत्री यांच्याकडे दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी तक्रार दाखल करून अद्याप त्यांना न्याय न मिळाल्याने उक्त आदिवासी कुटुंबियांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार येथे संपूर्ण कुटुंबासह आमरण उपोषण करण्याचा इशारा शासनाला दिला होता, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खामला (ता.धडगांव, जि.नंदुरबार) येथील आदिवासी कुटुंबाला न्याय मिळवून देऊन दोषी पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

धडगाव पोलिसांना दिनांक ०१/१२/२०२२ रोजी मिळालेल्या गुप्त खबरीनूसार खामला, ता.धडगाव, जि.नंदुरबार येथील दोन व्यक्तींविरूध्द दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आली आहेत.

१) पहिल्या व्यक्तीच्या घराची झडती घेतली असता रुपये १,५२,४१५/- किंमतीचा १४ किलो ४९० ग्रॅम बेकायदेशिर गांजा पोलीसांनी जप्त केला असून याबाबत धडगाव पोलीस स्टेशन, जि.नंदुरबार येथे गु.र.नं. ३३९/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

२) दुसऱ्या व्यक्तीच्या दुकानाची झडती घेतली असता विनापरवाना देशी, विदेशी दारू, बिअर विक्री करत असल्याचे आढळून आल्याने रुपये १,२१,३८५/- किंमतीची दारू पोलीसांनी जप्त केली असून याबाबत धडगाव पोलीस स्टेशन, जि.नंदुरबार येथे गु.र.नं. ३४०/२०२२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदरच्या दोन्ही प्रकरणी महू फुलाची दारू विक्री करण्यासंदर्भात गुन्हा दाखल नाही.

(३) नाही.

सदर दोन्ही प्रकरणी दागिने व पैसे धडगांव पोलीसांनी जप्त केलेले नाहीत.

(४) व (५) सदर प्रकरणी पहिल्या गुन्ह्यातील आरोपीने दिनांक १७/४/२०२३ व दिनांक ११/९/२०२३ रोजी तक्रार अर्ज केली आहेत. त्यांच्या दिनांक १७/४/२०२३ रोजीच्या अर्जाबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, शहादा उपविभाग यांनी चौकशी केली आहे. सदर चौकशीत अर्जदार यांनी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गांजा हा अंमली पदार्थाचा मुद्देमाल घरात साठवुन ठेवले प्रकरणी धडगांव पोलीसांनी त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करुन गुन्हयातील मुद्देमाल जप्त केल्या कारणाने अर्जदार यांनी मनात राग ठेवून पोलीसांविरुध्द खोटी तक्रार अर्ज केला असल्याचे दिसून आले आहे. यामुळे अर्ज दप्तरी फाईल करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालय व गोदामामधून कोट्यवधी रुपयांची विद्युत उपकरणे गहाळ झाल्याबाबत

**(३३) * २३३७१ श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालय व गोदामामधून सुमारे ११२ कोटी रुपयांची विद्युत उपकरणे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात गहाळ झाल्याचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी-MSEDCL) कंपनीने सदर गहाळ झालेल्या यंत्रसामुग्री प्रकरणी चौकशी सुरु केली असून आठवडाभरात चौकशी अहवाल येणे अपेक्षित असतानांही अद्याप अहवाल प्राप्त झाला नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणामध्ये दक्षता (व्हिजिलन्स) विभाग बंद करण्यात येणे, कंपनीने अंतर्गत हिशोब तपासणी बंद करणे, सॅप प्रणाली सक्षम नसणे, ऑडीट बंद केल्याने दरवर्षी स्टॉकची इनव्हेंटरीची मोजदाद होत नसणे त्यामुळे हिशोबावर नियंत्रण नसणे इत्यादी गोष्टींमुळे विद्युत यंत्रसामुग्री गहाळ होण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन यांनी केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरण कंपनीच्या ११२ कोटी रुपयांच्या गहाळ झालेल्या विद्युत उपकरणे व सामुग्रीबाबत विद्युत कंपनीने नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, यासंदर्भात अंतर्गत लेखा परिक्षकांनी अहवाल दिले आहेत काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर तसेच कामगार फेडरेशनने केलेल्या आरोपांबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरण कंपनीमध्ये सामुग्री व्यवस्थापन करीता SAP प्रणालीचा उपयोग करण्यात येतो. भांडारात पुरवठा झालेल्या साहित्याचा तसेच साहित्य वाटपाच्या / वापराच्या नोंदी सदर प्रणालीत घेण्यात येतात. मात्र काही ठिकाणी आपत्कालीन वेळी वापरलेल्या विद्युत साहित्याची नोंद SAP प्रणालीत वेळेत न घेतल्याने SAP प्रणालीतील stock व actual stock हयामध्ये तफावत आढळते. सदर stock चे दरवर्षी ऑडिट करण्यात येते. सन २०२२-२३ च्या अहवालात रुपये ११२.५६ कोटी ची तफावत आढळली होती. सध्या ही तफावत कमी होऊन रुपये ६२.१३ कोटी इतकी झाली आहे. सदर SAP प्रणालीत नोंदी घेऊन तफावत दुर करण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे.
(२) हे खरे नाही,

तथापि, महावितरण कंपनीच्या अंतर्गत तपासणी अहवालामध्ये SAP प्रणालीतील stock व actual stock यामधील तफावत दुर करण्याकरीता महावितरणच्या मुख्य कार्यालयाकडून क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक २७/०४/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार निर्देश देण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही,

तथापि, सदर आशयाची बातमी वर्तमानपत्रात दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ च्या सुमारास प्रकाशीत झाली होती. मात्र महावितरणमध्ये व्हिजिलन्स विभाग कार्यरत असून, कंपनीने अंतर्गत हिशेब तपासणी बंद केलेली नाही. कंपनी कायदा २०१३ नुसार, महावितरणमध्ये अंतर्गत लेखा परिक्षण, अंतर्गत लेखा परिक्षण विभागातर्फे empanelled असलेल्या सनदी लेखापालामार्फतच (CA/CMA) व्यावसायिक पध्दतीने केले जाते. सदर सनदी लेखापालांमार्फत दरवर्षी वस्तुसूचीची/साठ्याची (Inventory) मोजदाद व SAP प्रणालीसोबत पडताळणी केली जाते. तसेच SAP प्रणालीमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी नाही ही वस्तुस्थिती पाहता सदर बातमीमध्ये तथ्य आढळून आले नाही.
(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे (मुंबई) येथील अभिनेता सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटसमोर दोन दुचाकीस्वारांनी गोळीबार केल्याबाबत

**(३४) * २३२०३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (मुंबई) येथील अभिनेता सलमान खानच्या गॅलेक्सी अपार्टमेंटसमोर दोन दुचाकीस्वारांनी ३ राऊंड गोळीबार केला असल्याची घटना माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान घडल्याची निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वीही सलमान खानला लॉरेन्स बिश्नोई उर्फ गोल्डी ब्रार टोळीकडून जीवे मारण्याच्या धमक्या आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सलमान खानच्या सुरक्षितेबाबत व हल्लेखोरांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक १४/०४/२०२४ रोजी अभिनेता सलमान खान हे राहत असलेल्या गॅलेक्सी अपार्टमेंट, बांद्रा, मुंबई येथे दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवरून येऊन सदर अभिनेत्यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या घरावर व घराच्या दिशेने गोळया झाडल्या. सदर प्रकरणी बांद्रा पोलीस ठाणे, गु.र.क्र. ५७७/२४, कलम ३०७, ३४ भादवि सह. कलम ३, २५ भा.ह.का. अन्वये दिनांक १४/०४/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा वांद्रे पोलीस ठाणे यांचेकडून गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांच्याकडे पुढील तपासाकामी वर्ग करण्यात आला असून गु.प्र.शा., गु.र.क्र. ३९/२०२४, कलम ३०७,३४ भा.दं.वि. सह ३, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हयाची पुनर्नोंद घेण्यात आली आहे. नमूद गुन्हयाच्या तपासात गँगस्टर लॉरेन्स बिष्णोई याने त्याच्या गुन्हेगारी टोळीच्या आर्थिक फायदा व वर्चस्वासाठी गुन्ह्यातील अटक व पाहिजे आरोपींसोबत फौजदारीपात्र कट रचून नमूद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने नमूद गुन्हयाच्या कलमात कलम १२० (ब), ५०६(२), ११५, २०१ भा.द.वि. सह कलम २७ भा.ह.का., सह कलम ३ (१)(ii), ३ (२), ३ (४) मोक्का कायदयाचा अंतर्भात करण्यात आला आहे. नमूद गुन्हयाच्या तपासात एकूण ०६ आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

सिनेअभिनेता श्री.सलमान खान यांच्या सुरक्षेसाठी बृहन्मुंबई पोलीसांमार्फत सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील सेवा-सुविधांचे जाळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत

**(३५) * २२९५८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील सेवा-सुविधांचे जाळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित न झाल्याने सेवा वाहिन्यांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी या वसाहतीतील रहिवाशांना दोन्ही यंत्रणांकडे पाठपुरावा करावा लागत असल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील सेवा वाहिन्यांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी या दोन्ही यंत्रणा एकमेकांकडे अंगुली निर्देश करीत असल्याने अनेक ठिकाणी दूषित पाण्याची समस्या उद्‌भवल्यामुळे रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले असून चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील म्हाडाच्या ५६ वसाहतींमधील सेवा-सुविधांचे जाळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

या संदर्भात सन २०१८ च्या पहिल्या अधिवेशनात उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सदरची कामे बृहन्मुंबई म.न.पा. यांचे मार्फत करण्यात येतील असे आश्वासन दिले होते. त्यानुसार म्हाडाच्या ५६ वसाहतीमधील जलवाहिन्या, मल:निस्सारण वाहिन्या व इतर सोई-सुविधा यांची देखभाल दुरुस्ती बृहन्मुंबई म.न.पा. ने करणे आवश्यक असल्याचे नगरविकास विभागाच्या सहमतीने या विभागाने दिनांक १८/१/२०२१ च्या पत्रान्वये आयुक्त, बृहन्मुंबई म.न.पा यांना कळविले आहे. या अनुषंगाने जलवाहिन्या, मल:निस्सारण वाहिन्या व इतर सोई-सुविधा ह्या जशा आहेत तशा स्थितीत बृहन्मुंबई म.न.पा कडे हस्तांतरीत करण्याबाबत या विभागाने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१)(कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.